परिशिष्ट क्रं.१

**संकेतस्थळावर प्रसिध्द करावयाच्या विस्तृत जाहीरातीचे प्रारुप**

**कार्यालयाचे नांवः- जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग**

**बाहयस्थयंत्रणेव्दारे जल जीवन मिशन, स्वच्छ भारत मिशन ग्रामीण घनकचरा सांडपाणी व्यवस्थापन करीता मनुष्यबळ उपलबध करुन घेण्याबाबत.**

केंद्र शासनाने सर्वांसाठी हर घर जल/गावामध्ये सांडपाणी व घनकच-याचे कामाचे धोरण शासनाने जाहीर केले आहे. या धोरणांतर्गत जल जीवन मिशन सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापनामध्ये काम जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन अंतर्गत ग्रामपचंचायत स्तरावर राबविण्यात येत आहे. सदर योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरीता सिंधुदुर्ग जिल्हयासाठी बाहयस्थयंत्रणेव्दारे ३० सप्टेबर २०२६ अखेरपर्यंतच्या कालावधीकरिता खालील तक्त्यात दर्शविलेल्यानुसार जिल्हा व तालुका स्तरावर मंजूर केलेल्या पदांसाठी त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या मानधनावर खालीलप्रमाणे मनुष्यबळ उपलब्ध करुन घ्यावयाचे आहे.

| अ.क्र. | स्तर | पदाचे नाव | जिल्हास्तर व तालुकास्तरावर आवश्यक असलेली मनुष्यबळ संख्या | मानधन प्रतिमाह प्रति मनुष्यबळ (GST व सेवाशुल्क वगळून) |
|---|---|---|---|---|
| १ | जिल्हास्तर | समन्वयक (पाणी गुणवत्ता monitoring and surveillance) सनियंत्रण व निरिक्षण | १ | ४०,८००/- |
| २ | जिल्हास्तर | पाणी व व्यवस्थापन सल्लागार | १ | ३५,०००/- |
| ३ | जिल्हास्तर | डेटा एन्ट्री ऑपरेटर | १ | १६,०००/- |
| ४ | तालुकास्तर | पाणी व व्यवस्थापन सल्लागार | ८ | २२,०००/- |
| ५ | तालुकास्तर | डेटा एन्ट्री ऑपरेटर | ८ | १२,०००/- |
| ६ | तालुकास्तर | उपविभागीय समन्वयक (पाणी गुणवत्ता) | ४ | १८३६५/- |
| ७ | जिल्हास्तर | शिपाई | १ | १८,३००/- |

यासाठी कामाचा पुरेसा अनुभव असलेल्या मनुष्यबळ पुरवठा करणा-या बाहययंत्रणांकडुन ई निविदा प्रणालीव्दारे निविदा मागविण्यात येत आहे. यासाठी खालील नमुद केलेल्या अटी व शर्ती लागु राहतील.

१. ई निविदा मध्ये फी रक्कम रुपये इसारा रक्कम रुपये ऑनलाईन पध्दतीने **नेट बँकीग किंवा एन.ई.एफ. टी. व्दारे बँक ऑफ महाराष्ट्र च्या खाते क्रमांक-६०४७२५३६७७३** खात्यामध्ये भरणा करावा. सदर बाबीमध्ये सुट असल्यास त्याबाबतचे प्रमाणपत्र सोबत जोडण्यात यावे.

२.अनामत रक्कम निविदाकाराने निविदा रक्कमेच्या ३% रक्कम ऑनलाईन व्दारे राष्ट्रीयकृत बँकेत कराराच्या वैध कालावधीकरीता Dist Project Director DWSM ZP Sindhudurg यांचे नावाने निविदा स्विकृत झाल्यानंतर १५ दिवसाचे आत दयावी लागेल.

३.निविदा स्वीकृतीचा कालावधी दिनांक / /२०२६ सकाळी ०९.०० वाजेपासुन
दिनांक / /२०२६ रोजी सांयकाळी १६.०० वाजेपर्यंत असुन सदर निविदा
दिनांक / /२०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता जिल्हा प्रकल्प संचालक, जि.प. सिंधुदुर्ग याच्या समक्ष उघडण्यात येईल.

४.सदर ई निविदा www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

**रविंद्र खेबुडकर (भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग**

**ई निविदा मध्ये खालील कागदपत्रांच्या सांक्षाकीत प्रति अपलोड करणे अनिवार्य आहे.या सर्व बाबीची पुर्तता असणारे निविदाधारकच गुणांकणासाठी पात्र ठरतील.**

| अ.क्र. | निकष | पात्रता निकष |
|---|---|---|
| १. | **नोंदणी** | बिडर ही मालकी हक्काची फर्म भागीदारी फर्म खाजगी मर्यादित/मर्यादित कंपनी/कॉर्पोरेट संस्था इत्यादी असावी आणि योग्य नोंदणी प्राधिकरणाकडे कायदेशीररित्या गठित/नोंदणी केलेली असावी. |
| २. | | कर्मचारी भविष्य निर्वाह निधी कायद्यांतर्गत बोलीदाराची योग्य प्राधिकरणाकडे नोंदणी केलेली असावी. |
| ३. | | कर्मचाऱ्यांच्या राज्य विमा कायद्यांतर्गत बोलीदाराने योग्य प्राधिकरणाकडे नोंदणी केली पाहिजे. |
| ४ | | कंत्राटी कामगार नियमन आणि निर्मूलन कायदा १९७० यासह कामगार योग्य प्राधिकरणांअंतर्गत निविदाकार नोंदणीकृत असावा. |
| ५. | | वस्तू आणि सेवा कर अधिनियम २०१७ अंतर्गत बोलीदार नोंदणीकृत असावा. |
| ६. | **सरासरी उलाढाल** | बोलीदाराची सरासरी उलाढाल मागील तीन आर्थिक वर्षांमध्ये मानवी संसाधनांच्या आउटसोर्सिंगच्या व्यवसायातून कामावर घेतलेल्या मनुष्यबळाच्या एका वर्षाच्या अंदाजे पगाराच्या किमान ५ पट असावी. |
| ७. | **नेट वर्थ** | बोलीदाराकडे मागील तीन आर्थिक वर्षांमध्ये नियुक्त करण्यात आलेल्या मनुष्यबळाच्या एका महिन्याच्या अंदाजे पगाराच्या किमान ३ पट सरासरी पॉझिटिव्ह नेट वर्थ असणे आवश्यक आहे. |
| ८. | **अनुभव** | बोलीदाराला आउटसोर्सिंगच्या आधारावर मनुष्यबळ/मानव संसाधने उपलब्ध करून देण्याचा किमान २ वर्षांचा अनुभव असावा किमान समान संख्येने मनुष्यबळ नियुक्त केले जावे. |
| ९. | | बोलीदाराने केंद्र/राज्य/निमशासकीय उपक्रम संस्था/स्थानिक स्वराज्य संस्था/पीएसयूसाठी किमान एक समान करार यशस्वीरित्या पूर्ण केलेला असावा. |
| १०. | | बोलीदाराने महाराष्ट्र राज्यात किमान एक समान करार यशस्वीरीत्या पूर्ण केलेला असावा. |
| ११. | | बोलीदार दोषी आढळला नाही आणि बिड सादर केल्याच्या तारखेपर्यंत कोणत्याही राज्य सरकार किंवा केंद्र सरकारच्या विभाग/केंद्रशासित प्रदेश/स्थानिक प्राधिकरणाने/केंद्र आणि राज्य सरकार उपक्रम किंवा सरकारी संस्थेद्वारे त्याला काळ्या यादीत टाकण्यात आलेले नाही किंवा प्रतिबंधित केले गेले नसलेबाबतचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. |
| १२. | | उक्त निविदा सूचनेतील निश्चित केलेल्या दरापेक्षा कमी दराने निविदा भरू नये. अन्यथा तुलनात्मक लिफाफा उघडण्याच्या वेळी अपात्र ठरविले जाईल. |
| १३. | **ISO प्रमाणन** | आउटसोर्सिंग आधारावर मानवी संसाधने प्रदान करण्यासाठी वैध ISO प्रमाणन असलेल्या आय.एस.ओ. प्रमाणन बोलीदाराला प्राधान्य दिले जाईल. |

१४.पॅन कार्ड, टॅन कार्ड, वस्तु व सेवाकर नोदणी प्रमाणपत्र.
१५. व्यवसायकर नोंदणी प्रमाणपत्र
१६.शॉप ॲक्ट रजिस्ट्रेशन नोंदणी प्रमाणपत्र.
१७.मनुष्यबळाची शैक्षणिक अर्हता बद्दलची व अनुभवासंबधातील कागदपत्रे सादर करणे आवश्यक राहील.
१८.मागील एक वर्षाचे जी.एस.टी भरल्याचे प्रमाणपत्र असणे आवश्यक राहील.
१९.सदर मनुष्यबळ पुरवठा ३० सप्टेबर २०२६ पर्यंत करण्यात येणार असून त्याकरीता संस्थने सेवा शुल्क इथे नमुद करावे.------------------
२०.संस्थेला मिळणा-या मानधनावर शासन नियमानुसार GST अदा करण्यात येईल.

ज्या बाहय यंत्रणा संस्थेला काम मंजुर करण्यात येईल तिला कामाचा आदेश देणेपुर्वी त्यांचेकडून शासकीय कायदयानुसार ठरवुन दिलेल्या रककमेच्या बॉन्ड पेपरवर मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग तथा प्रकल्प संचालक, जल जीवन मिशन, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग यांनी निश्चित केलेल्या अटी व शर्ती नुसार करारनामा करुन घ्यावा लागेल.

करारनाम्याचा कालावधी ३० सप्टेबर २०२६ पर्यंत राहील त्यानंतर करारनाम्यास मुदतवाढ देण्याचे अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग यांचेकडे राखीव राहतील.

**संस्थेची निवड करण्यासाठी जिल्हा स्तरावर समितीची स्थापना करण्यात आली असून ती खालील प्रमाणे आहे.**

| अ.क्रं. | संपुर्ण नांव | पद |
|---|---|---|
| १. | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग | अध्यक्ष |
| २. | कार्यकारी अभियंता, ग्रा.पा.पु. विभाग, जि.प.सिंधुदुर्ग | सदस्य |
| ३. | लेखाधिकारी, जल जीवन मिशन, जि.प.सिंधुदुर्ग | सदस्य |
| ४. | जिल्हा प्रकल्प संचालक,जल जीवन मिशन, जि.प.सिंधुदुर्ग | सचिव |

**जल जीवन मिशन स्वच्छ भारत मिशन ग्रामीण /घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन करणा-या बाहय यंत्रणांची निवड.**

मनुष्यबळ पुरवठा करणा-या यंत्रणेस यांना शासकीय कार्यालयात किमान १ वर्षाचा तांत्रिक मनुष्यबळ पुरवठा करण्याचा अनुभव असला पाहीजे या शिवाय निविदेमध्ये नमुद केलेल्या सर्व कागदपत्राच्या सांक्षाकित प्रती जोडणे आवश्यक अनिवार्य राहील.

**मनुष्यबळाची पात्रता**

| अ.क्रं. | पदाचे नांव स्तर मानधन | शैक्षणिक अर्हता/अनुभव/कर्तव्य आणि जबाबदा-या |
|---|---|---|
| १ | जिल्हास्तर समन्वयक (पाणी गुणवत्ता monitoring and surveillance) सनियंत्रण व निरिक्षण<br>मानधन ४०,८००/-<br>पदसंख्या- ०१ | **शैक्षणिक अर्हता**: बी.एस्सी. रसायनशास्त्र / पर्यावरण विज्ञान / सूक्ष्मजीवशास्त्र मध्ये. एम.एस्सी. रसायनशास्त्र / आणि पर्यावरण विज्ञान / मायक्रोबायोलॉजीमध्ये अधिक प्राधान्य असेल.<br>**अनुभव**: पाण्याच्या गुणवत्तेच्या कामाचा ३ वर्षांचा अनुभव. उमेदवारास शासनाचा अनुभव आहे. संबंधित जल गुणवत्ता देखरेख आणि देखरेख कार्यक्रमाला अधिक प्राधान्य असेल. एमएस ऑफिस, इंटरनेटचे चांगले ज्ञान.<br>**कर्तव्य आणि जबाबदा-या** - राज्यस्तरावरुन वेळोवेळी आखण्यात आलेल्या पाणी गुणवत्ता कार्यक्रमाची<br>यशस्वीअंमलबजावणी करण्याकरीता विशेष प्रयत्न करणे.<br>राज्यस्तरावरुन वेळोवेळी आखण्यात आलेल्या पाणी गुणवत्ता कार्यक्रमाची यशस्वी अंमलबजावणी करण्याकरीता विशेष प्रयत्न करणे.<br>जिल्हयांची water quality profile बनविणे.<br>लाल कार्ड/ पिवळे कार्डयांचे रुपांतर हिरवे कार्ड होण्यासाठी पाणी गुणवत्ता निरिक्षकाच्या सहाय्याने संबधीत खात्याशी समन्वय ठेवुन पाठपुरावा करणे.<br>पाणी गुणवत्ता सल्लागार यांनी ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, आरोग्य विभाग ग्रामपंचायत विभाग व पाणी प्रयोगशाळा यांच्याशी समन्वय साधून कामकाज पाहावे.<br>दरमहा तालुकास्तरीय पाणी गुणवत्ता समित्यांच्या सभा होत आहेत अथवा नाहीत याचा आढावा मुख्य कार्यकारी अधीकारी यांना सादर करणे. तसेच या सभांना वेळोवेळी उपस्थित राहणे.<br>जिल्हास्तरावर पाणी गुणवत्ता समितीची दरमहा बैठक अतिरीक्त जिल्हा आरोग्य अधिकारी (सचिव,जिल्हा पाणी गुणवत्ता समिती) यांच्या समन्वयाने आयोजित करणे.<br>पाणी गुणवत्ता संनियंत्रणासाठी शासनाने वेळोवेळी काढलेले शासन निर्णय ,सुचना , परिपत्रके याबाबत जिल्हास्तरावरुन पाठपुरावा करणे.<br>जलसुरक्षकांचे प्रशिक्षण,क्षमता बांधणी ,मानधन ,मुल्यमापन व आढावा याबाबत पाठपुरावा करणे. |
| २ | जिल्हास्तर जिल्हा पाणी व स्वच्छता व्यवस्थापन सल्लागार<br>मानधन ३५०००/-<br>पदसंख्या- ०१ | **शैक्षणिक अर्हता** - बी.ई.पदवी धारक **अनुभव**: किमान २वर्ष **शैक्षणिक अर्हता** - बी.ई.डिप्लोमा सिव्हील, पदवीधारक **अनुभव**: किमान ५ वर्ष<br>**कर्तव्य आणि जबाबदा-या** - ग्रे वॉटर व्यवस्थापन व पाण्याचा स्त्रोतांचा शाश्वत विकास यांच्या अनुषंगाने जिल्हा स्थरावरील यंत्रणांना सहाय्य करणे. पिण्याच्या पाण्याचा पुरवठा,सांडपाणी आणि घनकचरा व्यवस्थापन,प्लास्टिक कचरा व्यथापन इत्यादी योजना तयार करण्यासाइी गावांना मदत करणे, सुरु असलेल्या विविध कामांची तांत्रिकदृष्टया पाहणी करणे,कामाच्या गुणवतेचे निरिक्षण करणे,अमलबजावणीशी संबधित विविध यंत्रणा आणि ग्रामपंचायत यांना मार्गदर्शन करणे इ.जिल्हा स्तरावरील अधिका-यानी सोपविलेले इतर कोणतेही काम/ कार्य पार पाडणे. |
| ३ | जिल्हास्तर डेटा एंट्री ऑपरेटर<br>मानधन १६०००/-<br>पदसंख्या- ०१ | **शैक्षणिक अर्हता** - पदविधारक व MSCIT कोर्स पुर्ण असावा **अनुभव**: किमान १ वर्ष अनुभव,<br>**कर्तव्य आणि जबाबदा-या** - टिपण्या आणि पत्रे टंकलिखीत करणे, जिल्हा, तालुका व ग्रामपचायत स्तरावरील विविध माहितीचे संकलन करणे,MIS प्रणालीमध्ये सर्व माहिती भरणे, आवश्यकतेनुसार अहवाल तयार करणे, संबधित अधिका-यानी नेमून दिलेली इतर कोणतेही कामे/ कार्य पार पाडणे. |

| | | |
|---|---|---|
| ४ | तालुकास्तर – तालुका पाणी व स्वच्छता व्यवस्थापन सल्लागार एकूण मानधन-२२०००/- पदसंख्या ०८ | **शैक्षणिक अर्हता** - बी.ई पदवी सिव्हील/बी.ई. डिप्लोमा सिव्हील किमान **अनुभव**- किमान १ वर्ष, पाणी व स्वच्छता क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य, फक्त शासकीय अनुभव ग्राहय धरण्यात येईल.<br>**कर्तव्य आणि जबाबदा-या** - ग्रे वॉटर व्यवस्थापन व पाण्याचा स्त्रोतांचा शाश्वत विकास यांच्या अनुषंगाने जिल्हा स्थरावरील यंत्रणांना सहाय्य करणे. पिण्याच्या पाण्याचा पुरवठा,सांडपाणी आणि घनकचरा व्यवस्थापन,प्लास्टिक कचरा व्यथ्यापन इत्यादी योजना तयार करण्यासाइी गावांना मदत करणे, सुरु असलेल्या विविध कामांची तांत्रिकदृष्टया पाहणी करणे,कामाच्या गुणवतेचे निरिक्षण करणे,अमलबजावणीशी संबधित विविध यंत्रणा आणि ग्रामपंचायत यांना मार्गदर्शन करणे इ.जिल्हा स्तरावरील अधिका-यानी सोपविलेले इतर कोणतेही काम/ कार्य पार पाडणे. |
| ५ | तालुकास्तर डेटा एंट्री ऑपरेटर मानधन १२०००/- पदसंख्या- ०८ | **शैक्षणिक अर्हता** - पदविधारक व एम.एस.सी.आय.टी. कोर्स पुर्ण असावा किमान **अनुभव**- किमान १ वर्ष<br>**कर्तव्य आणि जबाबदा-या** - टिपण्या आणि पत्रे टंकलिखीत करणे, व ग्रामपचायत स्तरावरील विविध माहितीचे संकलन करणे, MIS प्रणालीमध्ये सर्व माहिती भरणे, आवश्यकतेनुसार अहवाल तयार करणे, संबधित अधिका-यानी नेमून दिलेली इतर कोणतेही कामे/ कार्य पार पाडणे |
| ६ | तालुकास्तर उपविभागीय समन्वयक (पाणी गुणवत्ता) मानधन १८३६५/- पदसंख्या- ०४ | **शैक्षणिक अर्हता** –१२ वी विज्ञान.<br>बी.एस्सी. रसायनशास्त्र/पर्यावरण विज्ञान/मायक्रोबायोलॉजीला प्राधान्य दिले जाईल.<br>**अनुभव** : पाण्याच्या गुणवत्तेच्या कामाचा 3 वर्षांचा अनुभव. उमेदवारास शासनाचा अनुभव आहे. संबंधित जल गुणवत्ता देखरेख आणि देखरेख कार्यक्रमाला अधिक प्राधान्य असेल. एमएस ऑफिस, इंटरनेटचे चांगले ज्ञान.<br>**कर्तव्य आणि जबाबदा-या** - जल जीवन मिशन अंतर्गत पाणी गुणवत्ता संनियंत्रण व सर्वेक्षण विषयक बाबीच्या अनुषंगाने कार्यवाही करणे.<br>जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षातील समन्वयक (पाणी गुणवत्ता) संनियंत्रण व निरीक्षण यांना वेळोवेळी सहाय्य करणे.<br>जल जीवन मिशन अंतर्गत पाणी गुणवत्ता संनियंत्रण व सर्वेक्षण घटकांतर्गत वार्षिक कृती आराखडा निर्मिती, सादरीकरण व अंमलबजावणीबाबत कार्यवाही करणे.<br>शासनातर्फे जारी करण्यात येणाऱ्या पाणी गुणवत्ता संनियंत्रण व सर्वेक्षण कार्यक्रमाच्या शासन निर्णयाचे, परिपत्रकांची आणि पत्रांची अंमलबजावणी करणे.<br>अंमलबजावणी सहाय्य संस्था यांना पाणी गुणवत्ता विषयक उपक्रमांच्या अंमलबजावणी संदर्भात सहाय्य करणे.<br>उपविभागातील सर्व गावांमधील पाणी गुणवत्ता विषयक माहिती एकत्रित करणे.<br>गावातील घराघरात व शाळांना भेटी देऊन गावामध्ये व विद्यार्थ्यांमध्ये शुद्ध पिण्याच्या पाण्याबाबत जागरूकता निर्माण करणे.<br>उपविभागांमधील पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांची माहिती अद्ययावत ठेवणे.<br>जलसुरक्षक व पाणी गुणवत्ता विषयक काम करणाऱ्या इतर मनुष्यबळाच्या प्रशिक्षणासाठी पाठपुरावा करणे.<br>ग्रामसेवक व इतर शासकीय कर्मचारी वर्ग यांना रासायनिक दृष्ट्या प्रभावित/दूषित झालेल्या पाणी नमुन्यांबाबत माहिती देणे.<br>गावातील वाड्या वस्त्यांवरील पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत दूषित आढळून आल्यास दूषित पाण्याद्वारे पसरणाऱ्या जलजन्य आजारांची माहिती गावातील जनतेस देणे.<br>दूषित आढळून आलेल्या पाणी स्त्रोतांवरील प्रतिबंधात्मक उपाययोजनांसाठी गटविकास अधिकारी, उप अभियंता, आरोग्य अधिकारी यांच्याकडे पाठपुरावा करणे.<br>पाणी गुणवत्ता विषयक माहिती केंद्र शासनाच्या IMIS/WQMIS या संकेतस्थळावर नोंदीत करणेसाठी कार्यवाही करणे.<br>गावांमध्ये स्वच्छता सर्वेक्षण कार्यक्रम वर्षातून दोनवेळा पार पाडण्यासाठी आरोग्य अधिकाऱ्याकडे पाठपुरावा करणे.<br>स्वच्छता सर्वेक्षणामध्ये आढळून आलेल्या कमतरता भरून काढण्यासाठी पाठपुरावा करणे.<br>FTK, IEC साहित्याचे उपविभागांमधील प्रत्येक गावात वितरण व संनियंत्रण करणे.<br>तालुकास्तरीय जिल्हास्तरीय प्रशिक्षण कार्याशाळांना उपस्थित राहणे.<br>पाणी गुणवत्ता संनियंत्रण व सर्वेक्षण विषयक जिल्हा स्तरावर अद्ययावत माहिती वेळोवेळी सादर करणे.<br>नळ जोडणी व गावे हर घर जल घोषित करणेबाबत पाठपुरावा करणे. |

| | | |
|---|---|---|
| | | केंद्र व राज्य शासनाने आखून दिलेल्या विविध अभियानांची अंमलबजावणी करणे.<br>प्रशिक्षकांचे प्रशिक्षण आयोजित करणेबाबत कार्यवाही करणे.<br>अनुषंगिक माहिती जल शक्ती मंत्रालयाच्या संकेत स्थळावरील IMIS प्रणालीवर अद्ययावत करणेबाबत समन्वय साधणे.<br>प्रत्येक महिन्याला किमान 15 क्षेत्रभेटी कराव्यात, शक्य झाल्यास निवासी क्षेत्रभेट देणे.<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व प्रकल्प संचालक, जल जीवन मिशन, जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष यांनी जल जीवन मिशन अंतर्गत वेळोवेळी सोपविलेली कामे करणे. |
| ७ | जिल्हास्तर<br>शिपाई<br>मानधन १८,३००/-<br>पदसंख्या- ०१ | **शैक्षणिक अर्हता – १० वी पास**<br>**कर्तव्य आणि जबाबदा-या** - कार्यालय उघडणे व बंद करणे<br>कार्यालय प्रमुखांचे दालन व कार्यालयाची नियमित साफसफाई करणे<br>कार्यालयीन टपाल ने आण करणे व इतर अनुषंगिक कामकाज करणे<br>वरिष्ठांनी वेळोवेळी नेमून दिलेली कामे पार पाडणे. |

## संस्थेचा कालावधी

संस्थेची निवड ही करार केल्यापासुन ३० सप्टेबर २०२६ पर्यत राहील संस्थेचे काम समाधानकारक असल्यास याबाबतचा आढावा घेवून सदरच्या कार्यक्रमास शासनाकडून मुदतवाढ मिळाल्यास संस्थेस मुदतवाढ देणे व काम असमाधानकारक असल्यास त्यांचे काम कोणत्याही वेळी संपुष्टात आणण्याचे अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सिधुदुर्ग यांच्याकडे राखीव ठेवण्यात येत आहेत.

बाहय यंत्रणेस पुरवठा/ सेवा संपुष्टात आणावयाची असल्यास किमान एक महिना अगोदर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, यांना लेखी स्वरुपात कळविण्यात यावे. अशावेळी गुणानुक्रमे पुढील क्रमाने पात्र संस्थेची निवड करण्यात येईल पुन्हा निविदा मागविण्याची आवश्यकता राहणार नाही.

जल जीवन मिशन कार्यक्रमातील १. समन्वयक (पाणी गुणवत्ता monitoring and surveillance) सनियंत्रण व निरिक्षण २. पाणी व स्वच्छता व्यवस्थापन सल्लागार ३. डेटा एन्ट्री ऑपरेटर ४. उपविभागीय समन्वयक (पाणी व गुणवत्ता) ५. शिपाई ही पदे जिल्हा व तालुकास्तर कामे करणार असुन त्यांना सिंधुदुर्ग जिल्हयातील जिल्हास्तरावर जिल्हा प्रकल्प संचालक, पाणी व स्वच्छता मिशन कक्ष, जि.प.सिंधुदुर्ग आणि तालुका स्तरावर गटविकास अधिकारी, उपअभियंता, उपविभाग ग्रामीण पाणी पुरवठा यांच्या सनियंत्रणाखाली काम करावे लागेल. तालुक्यातील ग्रामपंचायतींना भेटी देवुन काम पहावे लागेल व कोणतेही दौऱ्याचे अतिरिक्त मानधन आदा केले जाणार नाही.

जल जीवन मिशन कार्यक्रमातील बाहयस्थ यंत्रणेकडुन घेण्यांत आलेल्या मनुष्यबळास मानधन अथवा कोणताही निधी थेट दिला जाणार नाही . कोणत्याही स्वरुपाचा पत्रव्यवहार हा थेट संस्थेशी करण्यांत येईल. संस्थेचे दरमहा देयकाची मागणी संबंधित जिल्हा प्रकल्प संचालक, पाणी व स्वच्छता मिशन कक्ष, जि.प.सिंधुदुर्ग यांच्याकडे करावी.

करारनामा कालावधी ३० सप्टेबर २०२६ पर्यंत राहील. करारनाम्याचा कालावधी कमी करणे किंवा जास्त करणे, मुदतवाढ देणे, विवादास्पद बाबीसाठी, या बाबतचे सर्व अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. सिंधुदुर्ग यांना राहतील.

सदर ई निविदा सुचना परिशिष्टे इत्यादी www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक- / /२०२६ रोजी सकाळी ०९.०० वाजलेपासून ते / /२०२६ रोजी सायंकाळी १६.०० वाजेपर्यंत उपलब्ध आहेत.

**कामाचे नाव**- जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, जिल्हा व तालुका स्तरावरील १.समन्वयक (पाणी गुणवत्ता monitoring and surveillance) सनियंत्रण व निरिक्षण २. पाणी व स्वच्छता व्यवस्थापन सल्लागार ३. डेटा एन्ट्री ऑपरेटर ४. उपविभागीय समन्वयक (पाणी व गुणवत्ता) ५. शिपाई या पदांसाठी बाहयस्थयंत्रणेव्दारे मनुष्यबळ उपलब्ध करून घेणे.

**ई निविदा**

| | |
|---|---|
| मनुष्यबळाचा अंदाजित खर्च (GST व सेवाशुल्क सहित) | र.रू ३६७६९१६/- |
| निविदा रक्कम | र.रू. ६०००/- पेमेंट ऑनलाईन करावे |
| इसारा रक्कम | र.रू. १०००००/- पेमेंट ऑनलाईन करावे |
| अनामत रक्कत | ३% करारनामा रक्कमेनुसार |
| निविदा प्रसिद्ध करणे | दिनांक / /२०२६ वाजता |
| निविदा उपलब्ध | दिनांक- / /२०२६ रोजी वाजलेपासून ते दिनांक / /२०२६ रोजी वाजेपर्यंत |
| संपर्क अधिकारी | जिल्हा प्रकल्प संचालक,जल जीवन मिशन, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग |
| निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक | दिनांक / /२०२६ रोजी वाजेपर्यंत |
| निविदा उघडण्याचा दिनांक | दिनांक / /२०२६ वाजता |
| निविदा उघडण्याचे ठिकाण | जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग |

रविंद्र खेबुडकर (भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद सिंधदुर्ग**

**निविदा लिफाफा १ अर्ज**

प्रति,

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग
विषय – स्वच्छ भारत मिशन ग्रामिण जल जीवन मिशन घनकचरा सांडपाणी व्यवस्थापन या पदावर मनुष्यबळ पुरविण्याची निविदा

दिनांक / /२०२६ आपले कार्यालयाच्या जाहिरातीनुसार जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष, जि.प.सिंधुदुर्ग कार्यालयात जल जीवन मिशन कार्यक्रमातील १. समन्वयक (पाणी गुणवत्ता monitoring and surveillance) सनियंत्रण व निरिक्षण २. पाणी व स्वच्छता व्यवस्थापन सल्लागार ३. डेटा एन्ट्री ऑपरेटर ४. उपविभागीय समन्वयक (पाणी व गुणवत्ता) ५. शिपाई या पदाच्या कामाकरिता मनुष्यबळ पुरविण्याबाबतची निविदा भरत आहेत.

| | | |
|---|---|---|
| १ | ई निविदा खरेदी फी | |
| २ | इसारा रक्कम | |
| ३ | ई निविदा धारकाचे संपुर्ण नाव पत्ता, मोबाईल नंबर | |
| ४ | संस्था कंपनी असल्यास सविस्तर तपशिल | |
| ५ | बोलीदार शौल ही एक मालकीची फर्म/भागीदारी फर्म खाजगी मर्यादित/मर्यादित कंपनी/कॉर्पोरेट संस्था इत्यादी असावी आणि योग्य नोंदणी प्राधिकरणाकडे कायदेशीररित्या गठित/नोंदणी केलेली असावी. | |
| ६ | निविदाधारकाची कर्मचारी भविष्य निर्वाह निधी कायद्यांतर्गत योग्य प्राधिकरणाकडे नोंदणी करावी. | |
| ७ | बोलीदाराने कर्मचारी राज्य विमा कायद्यांतर्गत योग्य प्राधिकरणाकडे नोंदणी केली पाहिजे. | |
| ८ | कंत्राटी कामगार नियमन आणि निर्मूलन कायदा १९७० सह कामगार प्राधिकरणांतर्गत बोलीदाराची नोंदणी करावी | |
| ९ | बोलीदार वस्तू आणि सेवा कर अधिनियम २०१७ अंतर्गत नोंदणीकृत असावा | |
| १० | बोलीदाराची सरासरी उलाढाल एका वर्षाच्या अंदाजे पगाराच्या किमान ५ पट असावी जिल्ह्यात गेल्या तीन आर्थिक वर्षांमध्ये मानवी संसाधनांच्या आउटसोर्सिंगच्या व्यवसायासाठी कामावर घेतलेल्या मनुष्यबळाच्या खर्चाच्या. | |
| ११ | बोलीदाराकडे मागील तीन आर्थिक वर्षांमध्ये जिल्ह्यात नियुक्त केलेल्या एका महिन्याच्या अंदाजे पगाराच्या किमान ३ पट सरासरी पॉझिटिव्ह नेट वर्थ असणे आवश्यक आहे. | |
| १२ | कामावर घेतले जाणारे मनुष्यबळ किमान तितकेच मनुष्यबळ आऊटसोर्सिंगच्या आधारे मानव संसाधन/मानव संसाधने उपलब्ध करून देण्याचा किमान २ वर्षांचा अनुभव असावा. | |
| १३ | बोलीदाराने केंद्र/राज्य/निमशासकीय उपक्रम संस्था/स्थानिक स्वराज्य संस्था/पीएसयूसाठी किमान एक समान करार यशस्वीरित्या पूर्ण केलेला असावा | |
| १४ | बोलीदाराने महाराष्ट्र राज्यात किमान एक समान करार यशस्वीरीत्या पूर्ण केलेला असावा | |
| १५ | बोलीदार दोषी आढळला नाही आणि बिड सबमिट केल्याच्या तारखेपर्यंत कोणत्याही राज्य सरकार किंवा केंद्र सरकारच्या विभाग/केंद्रशासित प्रदेश/स्थानिक प्राधिकरणाने/केंद्र आणि राज्य सरकार उपक्रम किंवा सरकारी संस्थांद्वारे त्याला काळ्या यादीत टाकण्यात आलेले नाही किंवा प्रतिबंधित केले गेले नाही. | |
| १६ | आउटसोर्सिंग आधारावर मानवी संसाधने प्रदान करण्यासाठी वैध आयएसओ प्रमाणपत्र असलेल्या बोलीदारास प्राधान्य दिले पाहिजे | |
| १७ | निविदा अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे प्रमाणपत्र | |
| १८ | मागील एका वर्षाचे जिएसटी भरल्याचे प्रमाणपत्र जोडावे. | |
| १९ | सदर मनुष्यबळ पुरवठा, पुरवठा आदेश दिल्यापासुन ३१ मार्च २०२५ यंतच्या कालावधीसाठी करावयाचा आहे त्यासाठी संस्थेने सेवाशुल्क नमुद करावे. | |
| २० | मनुष्यबळाची शैक्षणिक अर्हतेबददलची व अनुभवासंबंधातील कागदपत्रे सादर करणे सोबत जोडणे बंधनकारक राहील. | |

ठिकाण :
दिनांक :

निविदा धारकाचे नाव
सही व शिक्का